लाडिचे

अनुसूचित जमातीसाठी भारत सरकार
मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना व शिक्षण
शुल्क परीक्षा शुल्क देण्याची योजना....
कार्यपध्दतीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय, क्रमांक : आदिशि-१२०४/प्र.क्र.९/का.१२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १ ऑगस्ट, २००५

**प्रस्तावना :** भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना ही १९५९-६० पासून राज्य शासनाकडे केंद्र शासनाकडून हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. या योजनेखाली अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाच्या गटानुसार रु. २३५/- ते रु. ७४०/- (निवासी विद्यार्थी) आणि रु. १४०/- ते रु. ३३०/- या दराने निर्वाह भत्ता अदा केला जातो. त्याबरोबरच शिक्षण फी, परीक्षा फी व कॉलेज/ महाविद्यालयाची देय असलेली सक्तीची इतर फी ह्या खर्चांची प्रतिपूर्ती केली जाते. या योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून राज्याच्या बांधील खर्चाच्या वरील खर्चाच्या १०० टक्के अनुदान मंजूर करण्यात येते. महागाई निर्देशांकानुसार केंद्र शासनाकडून दर दोन वर्षांनी या योजनेकरिता उत्पन्नाची मर्यादा वाढविण्यात येते. सध्या सदर योजनेखाली विद्यार्थ्यांच्या पालकांच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रुपये १,००,०००/- एवढी निश्चित करण्यात आलेली आहे.

२. सर्व स्तरावरील मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचे वय आणि उत्पन्न विचारात न घेता शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क शिक्षण विभागाने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे संस्थेला प्रदान करण्यात येते. तथापि, बऱ्याच शैक्षणिक संस्थांकडून अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क वसुल करण्यात येते, असे निदर्शनास आले आहे. यामुळे याबाबत कार्यपध्दती ठरविण्याची आवश्यकता भासू लागली.

३. त्याचप्रमाणे भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेखाली विविध शैक्षणिक अभ्यासक्रमांसाठी कनिष्ठ महाविद्यालय/वरिष्ठ महाविद्यालयाकडून शिष्यवृत्तीसाठीचे प्रस्ताव जिल्हा स्तरावर प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्याकडे प्राप्त होतात. परंतु दरम्यानच्या काळात विद्यार्थी संख्या व महाविद्यालयाची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. त्यामुळे भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रस्तावांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असल्याने त्याची छाननी करणे, देयक तयार करणे, कोषागारातून रक्कम

पारीत करणे व धनाकर्षाद्वारे महाविद्यालयाकडे वर्ग करून त्यांच्यामार्फत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे तसेच शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क रक्कमेचे वाटप करण्यास अनेकवेळा विलंब होतो. पर्यायाने विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता वेळेवर न मिळाल्याने त्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यांच्या शिक्षणावर परिणाम होतो. काही वेळा विद्यार्थी शिष्यवृत्ती मिळाली नाही म्हणून निवेदने, आंदोलने अशा मार्गांचा अवलंब करतात. यावर उपाय म्हणून शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क वाटप योजनेत सुलभता आणून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क वेळेवर देण्यासाठी महाविद्यालय स्तरावरच शिष्यवृत्ती मंजूरीचे अधिकार प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> : अनुसूचित जमातीसाठीची भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती आणि शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क योजना परिणामकारक व सुलभरित्या राबविली जावी यासाठी शासन आता भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना मंजूर करण्याचे अधिकार प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्याऐवजी शासकीय व अनुदानित मान्यताप्राप्त विद्यापीठ संलग्न उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय/महाविद्यालयांचे प्राचार्य यांना प्रदान करण्यास शासन मंजूरी देत आहे. त्यांनी या शासन निर्णयातील परि. ३ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती तसेच सोबतच्या परिशिष्ट- १,२,३, व ४ मध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती रक्कम मंजूर करावयाची आहे. तथापि, शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क मंजूर करण्याचे अधिकार पूर्वीप्रमाणेच प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांना राहतील तसेच मान्यताप्राप्त विना अनुदानित महाविद्यालयातील व परराज्यात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम पूर्वीप्रमाणेच प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प मंजूर करतील.

२. शिष्यवृत्ती मंजुरीबाबतचे वरील अधिकार सद्यःस्थितीत प्रायोगिक तत्वावर असून १ वर्षाच्या कालावधीसाठी प्रदान करण्यात आले आहेत. १ वर्षाच्या कालावधीनंतर आढावा घेऊन पुढील निर्णय घेण्यात येईल.

३. <u>अटी व शर्ती</u> :-

१) अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शासकीय व मान्यताप्राप्त विद्यापीठ संलग्न अनुदानित उच्च माध्यमिक वर्ग/कनिष्ठ महाविद्यालय/महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी पुरविण्यात येणाऱ्या माहिती पुस्तिकासोबतच यापुढे भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काचे आवेदन पत्र जोडण्यात यावे.

२) सदर योजनेखाली नविन प्रवेशित विद्यार्थ्यांचे आवेदनपत्रे भरुन घेण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित शिक्षण संस्थेची राहील.

३) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांनी संबंधित कनिष्ठ महाविद्यालय/ महाविद्यालय यांच्याकडून तरतूदीची मागणी प्राप्त करुन घ्यावी व मागील वर्षातील

सर्वसाधारण ९० टक्के रक्कम तदर्थ अनुदानापोटी कोषागारातून आहरित करुन माहे जुलै अखेरपर्यंत महाविद्यालयांना वाटप करावी.

४) कनिष्ठ महाविद्यालय व महाविद्यालयास देण्यात आलेली तदर्थ अनुदानाची रक्कम वैयक्तिक स्वीय लेखा (पी.एल.ए.) खात्यातच जमा राहील. पी.एल.ए. खात्याव्यतिरिक्त इतर ठिकाणी सदरची रक्कम जमा करण्याची अनुमती महाविद्यालयास राहणार नाही. कनिष्ठ महाविद्यालय व महाविद्यालयाचे प्राचार्य सदर रक्कमेतून आवश्यक त्या प्रमाणात रक्कम काढून विद्यार्थ्यांना दरमहा बँकेमार्फत धनादेशाद्वारे वाटप करतील.

५) कनिष्ठ महाविद्यालय / महाविद्यालयास देण्यात आलेल्या तदर्थ अनुदानाचे समायोजन पुढील आर्थिक वर्षात मुल्यनिर्धारण करुन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पूर्ण करतील.

६) कनिष्ठ महाविद्यालय/ महाविद्यालयास प्राप्त झालेले परिपूर्ण अर्ज छाननी करुन त्यास मंजूरी देण्याची कार्यवाही संबंधित कनिष्ठ महाविद्यालय व महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी प्रचलित नियमानुसार करावी व त्यानंतर ते प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्याकडे सादर करावी.

७) महाविद्यालयातील नवीन व नुतनीकरण शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क अर्जाची नोंद संबंधित महाविद्यालयाने विहित नोंद वहीमध्ये अद्ययावत ठेवावी.

८) संबंधित महाविद्यालयाने शिष्यवृत्ती मंजूर केलेल्या आदेशानुसार प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांनी त्यांच्या कार्यालयातील कंट्रोल रजिस्टर मध्ये नोंद घ्यावी.

९) कनिष्ठ महाविद्यालय / महाविद्यालयांना अग्रिमापोटी दिलेल्या रक्कमेची अद्ययावत नोंद प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प स्वतंत्र नोंदवहीमध्ये महाविद्यालयनिहाय ठेवतील.

१०) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प हे संबंधित महाविद्यालयास दिलेल्या अग्रीम रक्कमेचे समायोजना/निर्धारण झाल्यानंतर उर्वरित रक्कम संबंधित महाविद्यालयास अदा करतील / वसुली करतील.

११) भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित महाविद्यालयाने दरवर्षी तदर्थ रक्कम प्राप्त होण्यापूर्वी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्याकडे सादर करणे बंधनकारक आहे.

१२) भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्कापोटी आदिवासी विकास विभागामार्फत प्राप्त झालेल्या रक्कमेचा स्वतंत्र हिशोब ठेवण्यात यावा. सदर रक्कमेचे लेखा परिक्षण सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत करण्यात येईल.

१३) संबंधित कनिष्ठ महाविद्यालय /महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या अर्जाच्या अनुषंगाने त्या त्या वर्षी लागणाऱ्या शिष्यवृत्तीच्या तरतुदीची अंतिम एकूण मागणी १५ नोव्हेंबर पूर्वी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्याकडे करतील.

१४) भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काच्या संदर्भात संबंधित कनिष्ठ महाविद्यालय/महाविद्यालयाची तपासणी व चौकशी करण्याचे अधिकार प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प किंवा आदिवासी विकास विभागाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यास राहतील.

१५) भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना संबंधित कनिष्ठ महाविद्यालय/ महाविद्यालयाचे प्राचार्यामार्फत त्यांच्या स्तरावर मंजुरीची कार्यवाही करुन वेळेत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काचे वाटप सुलभतेने व शीघ्रतेने करण्यासाठी प्रति विद्यार्थी रुपये ५/- याप्रमाणे सेवाशुल्क मिळण्यास महाविद्यालय पात्र राहील. सदर सेवा शुल्काची रक्कम भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्कापोटी प्राप्त होणाऱ्या तरतुदीमधून संबंधित महाविद्यालयास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प मंजूर करुन अदा करतील.

१६) या योजनेखाली शासकीय व मान्यताप्राप्त विद्यापीठ संलग्न अनुदानित उच्च माध्यमिक वर्ग/ कनिष्ठ महाविद्यालये/महाविद्यालयाच्या प्राचार्यांना शिष्यवृत्ती मंजुरीचे अधिकार प्रदान करण्यात आले असले तरी त्यावर आदिवासी विकास विभागाचे नियंत्रण राहील. या योजनेखाली विद्यार्थ्यांना वेळेवर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क देण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्राचार्यांची राहील. यात विलंब, गैरप्रकार अथवा काही अपहार झाल्यास संबंधित शैक्षणिक संस्थेविरुध्द दंडनीय कार्यवाही आणि / किंवा व्यवस्थापन त्याबाबतची जबाबदारी संबंधितावर १५ दिवसात निश्चित करुन संबंधितविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करेल. आवश्यकतेनुसार अफरातफरीच्या प्रकरणात प्राचार्य तात्काळ गुन्हा नोंदवतील आणि ज्या प्रकरणी सकृत दर्शनी प्राचार्य जबाबदार असल्यास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गुन्हा दाखल करतील. योग्य त्या चौकशीनंतर अफरातफर केलेल्या रकमेची वसुली दंडनीय व्याजासह संबंधित महाविद्यालयास देय असलेल्या अनुदानातून वसूल केली जाईल.

३. सदरहू कार्यपध्दती सन २००४-२००५ या शैक्षणिक वर्षापासून लागू राहील.

४. सदरहू शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक ३४१/०४/विनियम, दिनांक ३०.६.२००४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

मफीजुल हुसेन

( मफीजुल हुसेन )
सह सचिव

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव

मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव

मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव

मा. मंत्री / मा. राज्यमंत्री ( आ.वि. ) यांचे खाजगी सचिव
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
~~प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प~~
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे / नाशिक / नागपूर / अमरावती.
सर्व प्रकल्प, अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
सर्व जिल्हाधिकारी/ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद
सर्व अधिष्ठाता, वैद्यकीय  महाविद्यालये सर्व प्राचार्य, अभियांत्रिकी महाविद्यालये.
सर्व प्राचार्य, तंत्रनिकेतने / सर्व कृषि विद्यापीठे/सर्व विद्यापीठे
मा. प्रधान सचिव ( आदिवासी विकास ) यांचे स्वीय सहाय्यक.
मा.सह सचिव /सर्व उप सचिव ( आदिवासी विकास विभाग ) यांचे स्वीय सहाय्यक
सर्व कार्यासने , आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती (कार्या-१२), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,मुंबई.

## परिशिष्ट - १

**भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क वितरणाचे वार्षिक वेळापत्रक**

| अ.क्र. | महिना | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | एप्रिल | १. महाविद्यालयाने मागील आर्थिक वर्षात घेतलेले अग्रीम व अंतिम अनुदान असे एकत्रित घेतलेल्या अनुदानाचा हिशोब अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची संख्या आणि वितरित शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क यांची माहिती सादर करणे<br>२. महाविद्यालयाने उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करणे |
| २ | मे | १. महाविद्यालयाने संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (परि. ६ प्रमाणे) यांच्याकडून शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क फॉर्म व इतर स्टेशनरी उपलब्ध करुन घेणे.<br>२. महाविद्यालयाने चालू वर्षासाठी आवश्यक अग्रीमाची संवर्गनिहाय प्रवेशित विद्यार्थी संख्येची आकडेवारी कळविणे व लागणाऱ्या अनुदानाची मागणी करणे. |
| ३ | जून | १. महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज देतेवेळी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क, व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असणाऱ्या वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांचा निर्वाह भत्ता या योजनेचे अर्ज देणे तसेच अकरावी विज्ञान शाखेमध्ये प्रवेशित अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना जाती वैधता अर्जाचे वितरण करणे.<br>२. महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज त्यांच्याकडून स्वीकारते वेळी प्रवेश अर्जासोबतच वरील सर्व अर्ज भरुन घेणे व या अर्जासोबत आवश्यक असलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, मागील वर्षाचे उत्तीर्ण प्रमाणपत्र, फोटो इत्यादी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करुन घेणे.<br>३. महाविद्यालयांनी ज्या विद्यार्थ्यांचे जिल्हा बदल वा महाविद्यालय बदल असल्यास, जिल्हा बदल प्रमाणपत्र तसेच महाविद्यालय बदल प्रमाणपत्र घेऊन त्या वर्षाचे संबंधित विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क मंजूरीचे आदेश प्राप्त करुन घेणे. |
| ४ | जुलै | १. महाविद्यालयातील सर्व प्रवेशित अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या अर्जांची छाननी करुन अग्रीम मंजूर आदेश काढणे व त्याची यादी कनिष्ठ महाविद्यालय / महाविद्यालयाच्या सूचना फलकावर लावणे. |

| | | |
|---|---|---|
| | | २ प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडून अग्रीम रकमेचे धनादेश प्राप्त करून घेणे.<br>३ सर्व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचे शक्यतो एकाच बँकेत खाते उघडणे.<br>४ जुलै महिन्यापासून विद्यार्थ्यांना दरमहा चेकद्वारे शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रदान करणे. |
| ५ | ऑगस्ट | १ भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण फी व परीक्षा फी, व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असणाऱ्या वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांचा निर्वाह भत्ता इत्यादीबाबत प्राप्त अर्ज मंजूर करून ते अंतिम करणे. |
| ६ | सप्टेंबर | १ प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडे अंतिम अनुदान निर्धारणासाठी प्रस्ताव पाठविणे. |
| ७ | ऑक्टोबर | १ प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांनी अंतिम अनुदान निर्धारण करून अग्रीम दिलेल्या रकमेचे समायोजन करणे. त्यानुसार अतिरिक्त रक्कम (देय रक्कम) अनुज्ञेय ठरत असेल तर ती रक्कम मंजूर करून महाविद्यालयास अदा करणे आणि वसूलीपात्र रक्कम असल्यास महाविद्यालयाने अशी रक्कम चलनाद्वारे ३१ मार्च पूर्वी भरणे. |
| ८ | नोव्हेंबर | १ महाविद्यालयांनी पुढील वर्षाच्या आवश्यकत्या स्टेशनरीची / अर्जाची मागणी करणे |
| ९ | डिसेंबर ते जानेवारी | १ प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या तपासणीसाठी सर्व अभिलेख तयार ठेवणे. |
| १० | फेब्रुवारी | १ प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांनी अर्जांच्या छपाईबाबतची कार्यवाही करणे. |
| ११ | मार्च | १ सर्व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना अंतिम भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क दिल्याबाबतची खात्री करणे.<br>२ दिलेल्या अग्रीमातून विद्यार्थ्यांची परीक्षा फी परस्पर विद्यापीठ / मंडळाकडे जमा करणे.<br>३ महाविद्यालय व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांनी सर्व नोंदवह्या अंतिम नोंदी घेऊन अद्ययावत करणे व लेखापरीक्षणासाठी तयार ठेवणे. |

परिशिष्ट - २

## शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काचे जिल्हा कार्यालयाकडून प्रदान

शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क प्रदाने या योजनेअंतर्गत शैक्षणिक संस्थेला गतवर्षी मंजूर झालेल्या शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्काच्या रक्कमेपैकी ६० टक्के रक्कम जूनमध्ये तदर्थ अनुदान म्हणून मंजूर करण्यात येते. त्यातून दरमहा ठराविक रक्कम निर्वाह भत्ता म्हणून शैक्षणिक संस्थेतर्फे अदा करण्यात येते व शैक्षणिक वर्षाच्या शेवटी एकूण रक्कम मंजूर करुन त्यातून तदर्थ अनुदानाचे समायोजन केले जाते. म्हणजेच मंजुरीची प्रक्रिया ही वर्षाच्या शेवटी केली जाते. याकरिता सर्व संस्थांकडून सविस्तर प्रस्ताव प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्या कार्यालयाकडून मागविण्यात येतात व त्याची छाननी केली जाते व त्यानंतर मंजूर रक्कमेचे धनादेश संबंधित महाविद्यालयाकडे पाठविले जातात. त्याऐवजी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती मंजुरीचे अधिकार संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे . शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क मंजूर करण्याचे अधिकार पूर्वीप्रमाणेच प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांना राहतील. त्याकरिता खालीलप्रमाणे कार्यपध्दती . अंमलात आणण्यात यावी.

१. तदर्थ अनुदान मंजुरी -

अ गतवर्षी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मंजूर करण्यात आलेल्या शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क यासाठी अदा करण्यात आलेल्या रक्कमेच्या ९० % रक्कम महाविद्यालयाच्या मागणीप्रमाणे संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (परिशिष्ट-६ प्रमाणे) यांनी तदर्थ अनुदान मंजूर करुन माहे जूनमध्ये महाविद्यालयास पाठवावे. सदरहू रक्कम महाविद्यालयाने त्यांच्या वैयक्तिक खातेवही लेखा (पीएलए) खात्यामध्ये जमा करावी व त्यातून विद्यार्थ्यांना दरमहा धनादेशाद्वारे शिष्यवृत्तीचे वाटप करावे तसेच शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम महाविद्यालयाच्या वैयक्तिक खात्यावर जमा करुन घ्यावी. पी.एल.ए. खात्यातून आवश्यक तेवढीच रक्कम वेळोवेळी काढण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत सर्व रक्कम अथवा आवश्यकते पेक्षा जास्त रक्कम काढून, अन्य बँकेत /खात्यावर जमा करु नये. असा प्रकार आढळल्यास आर्थिक अनियमितता झाली असे समजून प्राचार्यांवर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.

ब शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रदान करणे या योजनेखाली वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या ९०% तदर्थ अनुदानातून विद्यार्थ्यांच्या फीची प्रतिपूर्ती करावी. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची फी वसूल करु नये असे आढळल्यास संबंधित महाविद्यालया विरुध्द फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करण्यात येईल.

क ज्या महाविद्यालयांनी पी.एल.ए. खाते अद्याप उघडले नसेल त्यांनी संबंधित कोषागार अधिकारी यांच्याकडे अर्ज करून खाते उघडण्याची कार्यवाही करावी. महालेखापाल मुंबई / नागपूर यांच्याकडे अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

ड ९०% तदर्थ अनुदान प्राप्त होताच सदर महाविद्यालयास त्याची मुद्रांकित पावती (स्टँप रिसीट) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्या कार्यालयास पाठविणे बंधनकारक राहील.

२. अंतिम अनुदान मंजुरी -

अ अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकडून भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क मंजुरीकरीता अर्ज प्राप्त झाल्यावर त्यांची छाननी करून शिष्यवृत्तीचे अर्जांची मंजुरी इत्यादी सर्व कार्यवाही महाविद्यालयाने करावयाची आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांस शैक्षणिक वर्षात मंजूर करावयाची रक्कम मंजूर झाल्यावर त्यातून त्यास अदा करण्यात आलेल्या तदर्थ अनुदानाच्या रक्कमेचे समायोजन करावे व उर्वरित १०% अनुदानाची मागणी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्याकडे माहे १५ नोव्हेंबर अखेर मंजुरी आदेश व विद्यार्थ्यांच्या संपूर्ण तपशीलासह पाठविण्यात यावी.

ब महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या उर्वरित १०% अनुदानाच्या मागणीनुसार प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प हे तदनंतर रक्कम मंजूर करून महाविद्यालयास माहे फेब्रुवारी अखेर पाठवतील.

क वरील प्रमाणे अंतिम अनुदान प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांना पूर्ण शिष्यवृत्तीचे वाटप करून भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क रक्कमेचे उपयोगिता प्रमाणपत्र परिपूर्णपणे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयास संबंधित महाविद्यालयाने माहे एप्रिल अखेर सादर करावे.

३. मुल्यनिर्धारण

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत मंजूर करण्यात आलेल्या वरील रक्कमेचे तपासणीचे काम माहे डिसेंबर व जानेवारी या कालावधीमध्ये करण्यात येईल. यामध्ये प्रामुख्याने खालील बाबी तपासण्यात येतील.

अ भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण फी, परीक्षा फी चे आवेदन पत्र व सहपत्र

ब वैयक्तिक स्वीय लेखा (पी.एल.ए.) व विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती मिळणेबाबतच्या मुद्रांकित पावत्या, खतावणी इत्यादी

क भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क वाटप नोंद वही

ड मुल्यनिर्धारण तक्ते

ई विद्यार्थ्यांना बँकेमार्फत वितरण होते का ? याची चाळणी.

## ४. लेख्यांचे वर्गीकरण

महाविद्यालयाने भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण फी, परीक्षा फी संबंधीच्या लेख्यांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करावे :-

अ सिर्ट, खतावणी, मुद्रांक पावत्या, पी एल ए पासबुक, बँक पुस्तक, चेक इत्यादी (कायम)

ब मंजुरी आदेश, मांग वहया, अ प्रपत्र (३० वर्षे)

क शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क आवेदन अर्ज (५ वर्षे)

## भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क अर्जाच्या तपासणीसाठी मार्गदर्शक सूचना

१. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण फी, परीक्षा फी आवेदन पत्र परिपूर्ण भरलेले असावे.

२. उत्पन्नाचा दाखला - उत्पन्नाचा दाखला सक्षम अधिकाऱ्याचा असावा. विद्यार्थ्यांचे पालक नोकरीत असल्यास त्यातील एकूण उत्पन्नाचा दाखला (उदा मूळ वेतन + महागाई भत्ता + इतर भत्ते मिळून मिळणारे उत्पन्न) तसेच इतर मार्गांनी मिळणारे उत्पन्न.

३. शाळा सोडल्याचा दाखला- मूळ टी. सी. घेणे, डुप्लीकेट टी. सी. बाबत दोन ठिकाणी प्रवेश घेतला नसल्याबाबत खात्री करण्यास यावी व टी. सी. कॉपी सादर करु शकत नाही याबाबत शपथपत्र घेणे.

४. जातीचा दाखला सक्षम अधिकाऱ्यांचा असावा (सदर दाखला खाडाखोड केलेला अथवा शंकास्पद नसावा)

५. मागील वर्षाचे उत्तीर्ण झाल्याबाबतचे गुणपत्रक

६. विद्यार्थिनीच्या बाबतीत (मुलींचे) लग्न झाले असल्यास पतीच्या उत्पन्नाचा दाखला जोडणे आवश्यक आहे

७. विद्यार्थी दुसऱ्या जिल्ह्यातून शिक्षणासाठी आला असल्यास जिल्हा बदल प्रमाणपत्र जोडणे आवश्यक.

८. विद्यार्थ्याने त्याच जिल्ह्यातून महाविद्यालय बदलल्यास मागील वर्षी शिष्यवृत्ती मिळाल्याच्या आदेश क्रमांकाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

९. वडील हयात नसल्यास वडिलांचा मृत्यू दाखला आवश्यक

१०. शिक्षणात खंड पडलेला असल्यास सक्षम अधिकाऱ्याचे गॅप प्रमाणपत्र व शपथपत्र

११. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीच्या अर्जावर त्यांच्या अलीकडील पासपोर्ट आकाराचा फोटो असावा.

१२. विद्यार्थी खाजगी किंवा महाविद्यालयाच्या वसतिगृहात राहात असल्यास वसतिगृह प्रमाणपत्र. सदर वसतिगृहात प्रवेश दिल्यापासून वसतिगृह निर्वाह भत्ता देता येईल. परंतु सदर वसतिगृहामध्ये निवासाची व भोजनाची अशा दोन्हीं सुविधा असणे आवश्यक आहे. याबाबतची खात्री करुन प्रमाणित करण्याची जबाबदारी ही प्राचार्यांची राहील.

१३. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क मंजूर करण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमास सक्षम विद्यापीठाची / बोर्डाची मान्यता असणे आवश्यक आहे.

१४. विद्यार्थी दुसऱ्या राज्यातून शिक्षणासाठी आला असल्यास त्याचा भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काचा अर्ज संबंधित राज्यातील संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्याकडे मंजुरीसाठी पाठविण्यात यावा. प्राचार्यांना शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क मंजूर करता येणार नाही.

परिशिष्ट - ४

**प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांनी महाविद्यालयीन अभिलेख तपासणी करिता मुद्दे :-**

१. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क आवेदन पत्र.

i) भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क आवेदन पत्र हे प्रपत्र " अ " नुसार आहे काय याची खात्री करणे.

ii) भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क आवेदन पत्र परिपूर्ण भरलेले आहे काय.

iii) शाळा सोडल्याचा दाखला, सक्षम अधिका-यांचा सदर विद्यार्थी दुस-या जिल्ह्यातून आला असल्यास जिल्हा बदल प्रमाणपत्र, त्याच जिल्ह्यातील दुस-या महाविद्यालयातून आला असल्यास पूर्वीच्या महाविद्यालयाचे शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क मिळाल्याचे आदेश क्रमांक, प्रमाणपत्र, पालक हयात नसल्यास मृत्यु दाखला/ॲफिडेव्हिट, शासकीय अथवा खाजगी वसतिगृहात राहत असल्यास वसतिगृह दाखला इत्यादी सहपत्र जोडलेले आहेत काय.

iv) निर्वाह भत्ता, शिक्षण फी व इतर फी इत्यादी चे दर बरोबर मंजूर केले आहेत काय.

v) मंजूर केलेली रक्कम प्रपत्र अ मध्ये बरोबर नमूद केली आहे काय.

२. वैयक्तिक ठेव लेखा :- (पी एल ए)

a) वैयक्तिक ठेव लेखा परिपूर्ण नोंदी कोषागारातून भरून घेतल्या आहे काय

b) भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क अंतर्गत अदा केलेले धनादेश तसेच कोषागारातून पी.एल.ए. मध्ये जमा केले आहे काय

c) वैयक्तिक ठेव लेख्यामधून आवश्यक तेवढीच रक्कम काढून उर्वरित रक्कम वैयक्तिक ठेव लेख्यामध्ये शिल्लक ठेवली आहे काय

d) वैयक्तिक ठेव लेख्यातील शिल्लक रक्कम व भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क वाटप झालेली रक्कम, प्राप्त झालेले अनुदानाशी सुसंगत आहे काय

e) वैयक्तिक ठेव लेख्यातून काढलेली रक्कम पूर्णपणे वाटप झाली आहे काय

३. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क मंजूरी आदेश
भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क मंजूरी आदेशामध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांना मंजूर केलेली रक्कम, एकूण रक्कम, मिळालेले अनुदान, वाटप रक्कम इत्यादी बरोबर आहे काय

४. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क वाटप नोंदवही

भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क मंजूर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या नावांसमोर नोंदी शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क वाटप नोंदवहीमध्ये घेतल्या आहेत काय.

५. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क बँक द्वारे वाटप केली आहे काय, नसल्यास त्याची सविस्तर कारणे नमूद करावी. बँकद्वारे वाटप केल्यास बँकची फाउंटन फाईल (लिस्ट) तपासणी साठी उपलब्ध झाले काय

६. निर्देश- नस्तावणी, बँक पासबुक, इ. अद्ययावत ठेवले आहे काय

७. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क रक्कम विद्यार्थ्यांस प्राप्त झाल्याबद्दल काही विद्यार्थ्यांची चौकशी करावी.

८. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकडून शासकीय फी वसूल केली आहे काय.

९. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क रक्कमेतून महाविद्यालयाने कपात केलेल्या फी ची रितसर पावती विद्यार्थ्यांना दिली जाते काय.

१०. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क अनुदानातून शिल्लक राहिलेली रक्कम कोषागारातून चलनाद्वारे जमा केली आहे काय.

११. प्राचार्यांच्या अडचणी बाबत चर्चा करावी.

१२. उपयोगिता प्रमाणपत्र, वितरण प्रमाणपत्र, स्टॅम्प रिसीट इ. कार्यालयास पाठविले आहे काय.

## भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती मंजूर करताना घ्यावयाची दक्षता

### शिष्यवृत्ती मंजुरीची कार्यपद्धती

१) अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनाच ही शिष्यवृत्ती देय आहे.

२) जे शासनमान्य अभ्यासक्रम मान्यताप्राप्त अनुदानित तथा विनाअनुदानित संस्थांमधून शिकविले जातात अशा अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या मॅट्रिकोत्तर शिक्षणासाठी ही शिष्यवृत्ती मंजूर करता येते.

३) महाविद्यालयांनी त्यांच्या कनिष्ठ महाविद्यालय / महाविद्यालयास मान्य केलेल्या विद्यार्थी संख्येच्या अधीन राहूनच ही शिष्यवृत्ती मंजूर करावी.

४) पात्र अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे त्यांच्याकडून भरून घेऊन त्यासोबत खालील कागदपत्रे घ्यावीत.

अ) विहित नमुन्यातील पूर्ण भरलेला अर्जाचा नमुना
ब) अर्जासोबत पासपोर्ट आकाराचा फोटोग्राफ (१ प्रत)
क) मागील वर्षी उत्तीर्ण झालेल्या परीक्षेचे प्रमाणपत्र
ड) जातीचे प्रमाणपत्र (सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले)
इ) तहसीलदार किंवा त्यांच्या दर्जाच्या महसूल अधिकाऱ्याने दिलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र.
फ) महाविद्यालय बदललेले असल्यास मागील वर्षी मिळालेल्या शिष्यवृत्तीचा मान्यता क्रमांक व रक्कम.

५) सदर शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थी हा भारतीय असावा.

६) सदरची शिष्यवृत्ती ही केंद्र शासनाने मान्य केलेल्या अभ्यासक्रमासाठीच अनुज्ञेय आहे.

७) केंद्र शासनाच्या भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीच्या नियमावलीमध्ये नमूद केलेले अभ्यासक्रम व त्या अभ्यासक्रमास निवासी व अनिवासी विद्यार्थ्यांना प्रतिमहा किती शिष्यवृत्ती द्यावी या विषयी सविस्तर विवेचन केलेले असून, त्यानुसारच शिष्यवृत्ती मंजूर करावी.

८) शिष्यवृत्ती मंजूर करण्याबाबत काही अडचणी उद्भवल्यास संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (परिशिष्ट-६ प्रमाणे) यांचेकडे संपर्क साधावा.

<u>**नूतनीकरणाची कार्यपध्दती**</u>

१) नूतनीकरण करताना मागील वर्षी जे विद्यार्थी महाविद्यालयात शिक्षण घेत होते ते त्याच महाविद्यालयात यावर्षी प्रवेशित आहेत किंवा कसे याची खात्री करुन घ्यावी.

२) सदर विद्यार्थी मागील वर्षी ज्या अभ्यासक्रमातील ज्या वर्षात शिकत होता ती परीक्षा त्याने उत्तीर्ण केलेली आहे याची खात्री करुन घ्यावी.

३) नूतनीकरण करताना विद्यार्थ्यांकडून प्राप्त आवेदनपत्रे भरुन घेणे बंधनकारक नाही. केवळ अशा विद्यार्थ्यांची यादी "अ" प्रपत्रामध्ये तयार करुन त्यास प्राचार्यांनी मान्यता द्यावी.

४) एका विद्यार्थ्यास एकच अभ्यासक्रम पूर्ण करेपर्यंत ही शिष्यवृत्ती लागू राहील. उदा- ११वी, १२वी कला- बी.ए., एम.ए., एम.फिल., पी.एच.डी. परंतु एखाद्या विद्यार्थ्याने बी.ए. नंतर बी.एड. हा अभ्यासक्रम पूर्ण केला आणि नंतर त्याने एम.ए.साठी प्रवेश घेतला तर एम.ए.कोर्ससाठी त्यास शिष्यवृत्ती मंजूर होणार नाही. परंतु बी.एड. नंतर एम.बी.ए.ला प्रवेश घेतल्यास तो प्रोफेशनल पदव्युत्तर अभ्यासक्रम असल्यामुळे त्यास शिष्यवृत्ती मंजूर करता येईल. एका विद्यार्थ्यास २(दोन) व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी ही शिष्यवृत्ती अनुज्ञेय असेल.

५) शिष्यवृत्ती घेणाऱ्या विद्यार्थ्याने ज्या अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती घेतलेली आहे तो अभ्यासक्रम त्याने पूर्ण केला पाहिजे. जर तो अभ्यासक्रम त्याने अर्धवट सोडला व दुसऱ्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला तर दुसऱ्या अभ्यासक्रमाची शिष्यवृत्ती त्यास अनुज्ञेय होणार नाही. उदा- जर एखाद्या विद्यार्थ्याने बी.एस.सी.प्रथम वर्ष या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊन पूर्ण वर्षाची शिष्यवृत्ती उचललेली होती. पुढील वर्षी बी.एस.सी. द्वितीय वर्षात प्रवेश न घेता त्याने बी.ए.प्रथम वर्षासाठी दुसऱ्या किंवा त्याच महाविद्यालयात प्रवेश घेतल्यास त्याला शिष्यवृत्ती अनुज्ञेय होणार नाही. बहुतेक विद्यार्थी अर्ध्यातून अभ्यासक्रम सोडून दुसऱ्या अभ्यासक्रमात प्रवेश घेताना गॅप सर्टिफिकेट सादर करतात व त्या प्रतिज्ञापत्रामध्ये मागील वर्षामध्ये कोठेही प्रवेश घेतलेला नव्हता व मी शिकत नव्हतो असे लिहून देतात. वास्तविक पाहता अशा केसेसमध्ये तो मागील वर्षी खरेच कोठेही प्रवेशित नव्हता व त्याने अर्ध्यातच एखादा अभ्यासक्रम सोडून आता दुसरीकडे प्रवेश घेतला आहे किंवा कसे याबाबतची खात्री करणे आवश्यक आहे.

[illegible]

१) प्राप्त झालेल्या आवेदन पत्रांची विहित नमुन्यातील नोंदवहीत विद्यार्थीनिहाय नोंद घेणे

२) नोंद घेतल्याशिवाय अपूर्ण कागदपत्रे असलेली आवेदनपत्रे वेगळी करून अपूर्ण कागदपत्रांची विद्यार्थ्यांकडून पूर्तता करून घेणे व पूर्ण असलेली आवेदनपत्रे मंजूरीसाठी प्राचार्यांकडे सादर करणे.

३) मंजूर झालेल्या विहित आदेशाच्या ५ प्रती तयार करून त्या खालीलप्रमाणे वितरीत करणे :-

अ) पहिली व दुसरी प्रत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांना पाठविणे

ब) तिसरी प्रत महाविद्यालयाने अभिलेख्यात ठेवणे

क) चौथी प्रत महालेखापाल यांच्या तपासणीसाठी स्वतंत्र नस्तीमध्ये जतन करून ठेवणे

ड) पाचवी प्रत विद्यार्थ्यांस माहितीसाठी सूचना फलकावर प्रदर्शित करणे

४) मंजूर झालेल्या आदेशाची नोंद चेक रजिस्टरला घेणे.

५) विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या रकमेप्रमाणे प्रतिमाह चेक आणि शिष्यवृत्तीचे वितरण करून त्याची नोंद विद्यार्थी वाटप नोंदवहीमध्ये घेणे.oooooooooo

६) विद्यार्थ्यांना वाटप न केलेली व तशीच पडून राहिलेली शिष्यवृत्तीची रक्कम चलनाद्वारे शासकीय तिजोरीत जमा करून, प्रतिवर्षी उपयोगिता प्रमाणपत्र व चलनाची प्रत चेक रजिस्टरला नोंद करून प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयास पाठविणे.

७) एकूण प्राप्त झालेली रक्कम, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वितरीत केलेली रक्कम व त्यानंतर जादा लागणारी किंवा उरलेली रक्कम याबाबत सविस्तर हिशोब प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांना देणे.

८) भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीधारकांना मिळालेल्या रकमेचा हिशोब ठेवण्यासाठी स्वतंत्र कीर्द व खतावणी ठेवणे व ती सनदी लेखापाल (चार्टर्ड अकाउंटंट) यांचेकडून तपासून घेऊन वरीज-पत्रक निर्धारणासाठी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडे पाठविणे

९) मागील वर्षी आक्षेपाअभावी प्रलंबित असलेली आवेदनपत्रे विद्यार्थ्यांना वारंवार सूचना करूनही कागदपत्रे पूर्ण न केल्यास तसे विद्यार्थ्यांना कळविणे.

१०) मागील वर्षी मंजूर करण्यात आलेल्या शिष्यवृत्तीसंदर्भातील सर्व विद्यार्थ्यांची माहिती विहित नमुन्यात वर्गनिहाय शिष्यवृत्तीचे दर (निवासी, अनिवासी मुले-मुली यांच्या संख्येसह) सविस्तर माहिती प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयास सादर करणे.

११) दरमहा मासिक खर्चाचे विवरणपत्र विहित नमुन्यात प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाला सादर करणे.

१२) प्रत्येक वर्षाच्या ऑक्टोबर महिन्यात पुढील वर्षाचे अंदाजपत्रक विहित नमुन्यात सादर करणे.

१३) जे विद्यार्थी संस्था बदलतात त्यांना संस्था बदली प्रमाणपत्र व मागील वर्षी मंजूर केलेल्या शिष्यवृत्तीचा मंजुरी आदेश क्रमांक व दिनांक देण्याची व्यवस्था करणे.

१४) सर्व महाविद्यालयांनी त्यांना प्राप्त झालेली रक्कम जिल्हा कोषागार कार्यालयात पी.एल.ए. खात्यामध्ये जमा करावी आणि दरमहा आवश्यक तेवढीच रक्कम पी.एल.ए. मधून काढून ती विद्यार्थ्यांना धनादेशाद्वारे वितरीत करावी.

१५) व्यावसायिक पाठ्यक्रम पूर्ण करुन अव्यावसायिक पाठ्यक्रमास प्रवेश घेतल्यास त्यास शिष्यवृत्ती मिळणार नाही. उदा- बी.एड. अथवा एल.एल.बी. पूर्ण झाल्यानंतर एम.ए., एम.एस्सी., एम.कॉम इत्यादी साठी प्रवेश घेतल्यास त्यास शिष्यवृत्ती अनुज्ञेय नाही.

१६) महाराष्ट्रा बाहेरचे विद्यार्थी जर महाविद्यालयात शिकत असतील तर त्यांना महाराष्ट्र शासनातर्फे ही शिष्यवृत्ती मंजूर होणार नाही. अशा विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ते ज्या राज्यातील आहेत त्या राज्याकडे पाठवून त्या राज्यातून अशी शिष्यवृत्ती प्राप्त करुन घ्यावी. परराज्यातील विद्यार्थ्यांस आवेदनपत्र मंजूर करु नयेत.

१७) दरमहा शिष्यवृत्ती वितरण करताना विद्यार्थ्यांची हजेरी ७५% असली पाहिजे. हे बंधन पाळण्यात यावे.

१८) पुढील वर्षी नव्याने अनुदान मागणी करताना सोबत मागील वर्षाचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे सक्तीचे आहे.

१९) विद्यार्थ्याने डुप्लिकेट टी.सी. वर प्रवेश घेतला असल्यास त्याने मूळ टी.सी. सादर केल्याशिवाय त्यास शिष्यवृत्ती मंजूर करु नये.

२०) [illegible] संलग्नित महाविद्यालयाच्या [illegible] मान्यता असलेल्या [illegible] महाविद्यालयामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनमान्य अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती मंजूर करता येईल.

२१) शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काचे दर हे संबंधीत विद्यापीठाने ठरवून दिलेल्या दराएवढेच असावेत.

****************

परिशिष्ट-५

अर्जाचा नमुना ( भारत सरकार शिष्यवृत्ती )

भारत सरकार शिष्यवृत्तीसाठी सुधारित आवेदनपत्राचा
नमुना

फोटो

१. महाविद्यालयाचे नाव व पत्ता

---------------------------------

---------------------------------

---------------------------------

२. प्रवर्ग : अनुसूचित जमाती

३. वर्ग : ११ वी /१२ वी/पदवीधर- I /II/III/IV/V/
पदव्युत्तर - I / II / पदविका - I /II / III

४. शाखा : कला /वाणिज्य/विज्ञान / पदविकेचे नाव

अ विद्यार्थ्याची माहिती

१ पूर्ण नाव

२ वडिलांचे / पालकांचे नाव

३ कायमचा पत्ता

४ सध्याचा पत्ता

५ जन्मतारिख व वय

६ पुरुष / स्त्री

७ विवाहीत असल्यास पतीचे नाव

८ जमात- पोट जात

९ मागील वर्षी शिकत असलेल्या महाविद्यालयाचे नाव

१० मागील वर्षाच्या गुणांची टक्केवारी

११ मागील वर्षी मिळत असलेल्या शिष्यवृत्तीचा प्रकार

ब वडिलांची / पालकांची माहिती

१ वडिलांचे / पालकांचे नाव

२ वडिल / पालक यांचा व्यवसाय

३ एकूण वार्षिक उत्पन्न

अ) नोकरी मधून मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न (उदा. मूळ वेतन+ सर्व भत्ते)

३) अन्य मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न.

४ विवाहीत असल्यास पतीचे व पत्नीचे उत्पन्न

५ स्वत: नोकरी / व्यवसाय करीत असल्यास मिळणारे उत्पन्न.

क प्रवेशाची माहिती (अभ्यासक्रम विषयक)

१ चालू वर्षी ( सन ) प्रवेश घेतलेल्या महाविद्यालयाचे नाव

२ प्रवेश घेतलेली तारीख कोणत्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला त्याचे नाव व वर्ष (कला प्रथम वर्ष असे)

३ प्रत्यक्ष महाविद्यालयात दाखल झाल्याची तारीख

४ अभ्यासक्रम पूर्णकालीन किंवा अंशकालीन

५ दिवस महाविद्यालय की रात्र महाविद्यालय

ड वसतीगृहात राहत असल्यास

१ वसतीगृहाचे नाव शासकीय /अनुदानित

२ खाजगी वसतीगृहातच राहत असल्यास त्याची सविस्तर माहिती/ पुरावा

३ वसतीगृहात प्रवेश घेतल्याचा दिनांक

अर्जासोबत जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, मागील वर्षाची गुणपत्रिका यांच्या सत्यप्रती जोडाव्यात. वडिल हयात नसल्यास त्यांच्या मृत्यूचा दाखला जोडावा. आई व वडिल दोघेही हयात नसल्यास पालकांच्या उत्पन्नाचा दाखला जोडावा तथापि न्यायालयाच्या निकालाची प्रत जोडणे अत्यावश्यक राहील. शैक्षणिक वर्षात गॅप असल्यास तहसिलदारासमोरील प्रतिज्ञापत्र जोडावे. विद्यार्थी बाहेरच्या जिल्ह्यातून बदलीवर आल्यास जिल्हा बदल प्रमाणपत्र जोडावे. मुलीचे बाबतीत विवाहित असल्यास पतीच्या उत्पन्नाचा दाखला जोडावा.

*************

## कालावधी - मंजुरी आदेश (Time Bound Programme)

**अर्जांची छाननी करणे** - अर्जांची छाननी करताना महाविद्यालयाने केंद्र शासनाने भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीच्या नियमावलीमध्ये नमूद केलेल्या सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांकडून भरून घ्यावयाच्या अर्जाचा नमूना सोबत परिशिष्ट-७ प्रमाणे असेल. सदर अर्ज भरून घेताना खालील बाबींवर विशेष लक्ष देण्यात यावे :-

१ विद्यार्थ्यांचे नाव व पत्ता
२ पालकांचे वार्षिक उत्पन्न
३ विद्यार्थ्यांची जन्म तारीख
४ विद्यार्थ्यांची जात व पोट जात
५ मागील वर्षी उत्तीर्ण झाला आहे काय
६ मागील वर्षी अर्ध्यातूनच शिक्षण सोडले आहे काय.
७ महाविद्यालयात प्रत्यक्ष त्याने केव्हा प्रवेश घेतला आहे.
८ सदरचा विद्यार्थी वसतीगृहात राहतो किंवा कसे
९ विद्यार्थी बाहेरच्या जिल्ह्यातून बदलून आला आहे किंवा कसे
१० विद्यार्थी दोन अभ्यासक्रमांना प्रवेश घेतला आहे किंवा कसे
११ विवाहीत असल्यास पती / पत्नीचे उत्पन्न.

[illegible]

मी / [illegible] अटी व शर्ती मला /आम्हास मान्य आहेत. अर्जात वरीलप्रमाणे दिलेली सर्व माहिती पूर्णपणे सत्य आहे. सदरची माहिती खोटी अथवा अपुरी आढळल्यास भारतीय दंड विधान नियम १९९ व २०० प्रमाणे होणाऱ्या दंडास / शिक्षेस मी /आम्ही पात्र आहे / आहोत. त्यापैकी कोणतीही माहिती या निवेदन चुकीचे आढळून आल्यास सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला निर्णय अंतिम असेल व तो माझ्यावर / आम्हांवर बंधनकारक असेल अशी मी / आम्ही हमी देतो. जर शिष्यवृत्तीची रक्कम जास्तीची मिळाली तर ती मी / आम्ही परत करेन / करू. अशी जास्तीची अथवा अन्य कारणामुळे वसुल करण्यात येणारी रक्कम मी / आम्ही पूर्णपणे परत करण्याची हमी देतो. उत्पन्नाची व जातीची माहिती खोटी आढळल्यास संबंधीत विद्यार्थ्यां विरुद्ध व त्याचे पालकांविरुद्ध होणाऱ्या कारवाईस मी / आम्ही स्वतः जबाबदार राहू.

अर्जदाराच्या वडीलांची / पालकाची सही　　　　　अर्जदाराची सही

( अर्जदाराशी नाते )

| सं.क्र. | बाब | मान्य केलेली रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| अ | शिक्षण फी | | |
| | परीक्षा फी | | |
| | इतर फी | | |
| | १ नाव नोंदणी फी | | |
| | २ प्रवेश फी | | |
| | ३ ग्रंथालय फी | | |
| | ४ प्रयोगशाळा फी | | |
| | ५ ओळखपत्र फी | | |
| | ६ स्नेहसंमेलन फी | | |
| | ७ जिमखाना/क्रीडा फी | | |
| | ८ नियतकालीका फी | | |
| | ९ प्रात्यक्षिक फी | | |
| | १० विद्यार्थी कल्याण निधी | | |
| | ११ विषयवार सहल | | |
| | १२ संगणक फी | | |
| | १३ इतर फी | | |
| | एकूण | | |

## शिक्षण संस्थेचे प्राचार्यांची शिफारस

अर्जदाराने वरील अर्जात दिलेली सर्व माहिती, त्याच्या कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न, तो सध्या शिकत असलेल्या अभ्यासक्रमाची माहिती, शैक्षणिक माहिती, त्याची वसतिगृहात / वसतीगृहाबाहेर राहण्याची माहिती पूर्णपणे तपासलेली असून ती बरोबर आहे. त्यामुळे मी प्राचार्य ( महाविद्यालयाचे नाव) अभ्यासक्रम वर्षासाठी श्री मागासवर्गीय सवर्गासाठी नियमाप्रमाणे मान्य होणारी वार्षिक शिष्यवृत्ती / शिक्षण फी / परीक्षा फी खालीलप्रमाणे एकूण रु.

( अक्षरी रु. ) मंजूर करीत आहे.

मी निम्नस्वाक्षरीत हमी देतो की, अर्जदाराची शिष्यवृत्ती / इतर सर्व प्रकारची रक्कम जी माझ्याकडे सुपूर्द केलेली आहे ती ज्या प्रयोजनासाठी दिलेली आहे, त्या विशिष्ट प्रयोजनासाठी मी ती संवितरीत करीन आणि त्या बाबीचे हिशोब ज्या प्राधिकाऱ्याने ही तरतूद सुपूर्द केलेली आहे, त्या प्राधिकाऱ्याकडे नियमितपणे पाठविन. अर्जदार संस्था सोडून गेल्यास किंवा त्याने अभ्यासक्रम बंद केल्यास किंवा अन्य कोणत्याही अनियमितपणे त्याचा प्रवेश रद्द झाल्यास त्याला शिष्यवृत्ती देणे बंद करण्यात येईल. सुपूर्द करण्यात आलेल्या रकमेपैकी असंवितरीत असलेली रक्कम सरकारी लेख्यात परत करण्यात येईल व त्याची संपूर्ण जबाबदारी प्राचार्य या नात्याने माझ्याकडे राहील.

प्राचार्यांची सही

नाव व पदनाम

महाविद्यालयाचा शिक्का

ठिकाण

दिनांक

### मंजुरीचा तपशील.

| अभ्यासक्रम | वर्ष | निर्वाह भत्ता | | शिक्षण फी | परीक्षा फी | इतर फी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नियमित | अनियमित | | | | |

छाननी करणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालय : महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्याची स्वाक्षरी कनिष्ठ महाविद्यालय : महाविद्यालयाचे प्रमुख लिपिक-अधिक्षक यांची स्वाक्षरी तपासणी अधिकारी यांची सही :

राज्यातील शासनमान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या **विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

आदिवासी विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक : व्यअप्र-२०११ / प्र.क्र.२७९ / का.१२

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : २१ जानेवारी, २०१२.

**वाचा** :- १) शासन निर्णय ,आदिवासी विकास विभाग क्र. व्यअप्र-२००९ / प्र.क्र.९४ / का-१२, दि.२८ ऑगस्ट,२००९

२) शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग क्र.व्यअप्र-२००९/प्र.क्र.२५४/का.१२,दि.२७ डिसेंबर, २०१०.

**प्रस्तावना** :-राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षण संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणा-या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती या योजनेस प्रथम सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षाकरीता मंजूरी देण्यात आली होती. त्यानंतर सन २००७-०८, २००८-०९, सन २००९-१० व सन २०१०-११ या वर्षात सदर योजना राबविण्यास मंजूरी देण्यात आली. तथापि, सन २०११-१२ या वर्षासाठी सदर योजनेस मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय** : राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची सन २०११-१२ या वर्षासाठी शिक्षण शुल्क समिती, प्राधिकरण किंवा परिषदेने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्कांची प्रतिपूर्ती करण्यास शासन मान्यता देत आहे.

२. सदर योजना सन २००६-०७, सन २००७-०८, सन २००८-०९ , सन २००९-१०, सन २०१०-११ व २०११-१२ या शैक्षणिक वर्षात खालील व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमाच्या पूर्ण कालावधीपर्यंत लागू राहील. तथापि, विद्यार्थी अनुत्तीर्ण झाला तर शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्कांची प्रतिपूर्ती करण्यात येणार नाही.

अ) आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रम (वैद्यकीय, दंत, होमिओपॅथी, युनानी, आयुर्वेद, भौतिकोपचार, व्यवसायोपचार व नर्सिंग)

ब) उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत असणारे अभ्यासक्रम :

| पदविका | पदवी | पदव्युत्तर पदवी |
|---|---|---|
| अभियांत्रिकी | अभियांत्रिकी | एम.बी.ए |
| औषधनिर्माणशास्त्र | औषधनिर्माणशास्त्र | एम.सी.ए. |
| एच.एम.सी.टी. | एच.एम.सी.टी. | -- |
| -- | वास्तुशास्त्र | -- |

D:\SO\2YEAR 2012 C.R. 279 -Thakur lwp.lwp

रा.मु.मु. T/एच-२६६९[ ७००-०२-१२]-१

क) : कृषी, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभागांतर्गत पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच बी.एस.सी. (जैव तंत्रज्ञान).

ड) इ.१० वी ची शालांत परिक्षा (एस.एस.सी./सी.बी.एस.ई. व तत्सम) उत्तीर्ण झाल्यानंतरचे महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे पूर्ण वेळ अभ्यासक्रम (फुलटाईम कोर्स).

३. या योजनेचा लाभ विनाअनुदानीत तसेच कायम विनाअनुदानीत महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना खाली नमूद केलेल्या अभ्यासक्रमांसाठीही पुढील अटी व शर्तींच्या अधिन राहून देण्यात येईल :-

अ) <u>अभियांत्रिकी अभ्यासक्रम</u> :- शासनाच्या सामायिक प्रवेश परिक्षेद्वारा (सी.ई.टी.) प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना लागू राहील. सदर योजनेचा लाभ संस्था स्तरावर करण्यात येत असलेल्या (Institutional Level Quota) परिक्षेद्वारे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही.

ब) <u>आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम</u> :- शासनाच्या सामायिक प्रवेश परिक्षेद्वारा (सी.ई.टी.) प्रवेश घेतलेल्या तसेच खाजगी विनाअनुदानीत महाविद्यालयाच्या वतीने तसेच असोसिएशनमार्फत घेण्यात येणाऱ्या सामायिक प्रवेश परिक्षेद्वारा (Associate CET) आणि इ.१२ वी च्या गुणांच्या आधारे काही अभ्यासक्रमांसाठी (उदा.नर्सिंग) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागू राहील. एकूण प्रवेश क्षमतेच्या १५% जागा अनिवासी भारतीयांकरिता राखून ठेवल्या जातात. सदर व्यवस्थापन कोटयामध्ये प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांस तसेच अभिमत विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ कोणत्याही परिस्थितील अनुज्ञेय राहणार नाही.

क) <u>कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय व मत्स्यव्यवसाय अभ्यासक्रम</u> :- काही अभ्यासक्रमांसाठी शासनाची सामायिक परिक्षा (सी.ई.टी.) घेण्यात येत नाही. त्यावेळी इ. १२ वी च्या गुणांच्या आधारावर अशा अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ही योजना लागू राहील.

४. शालेय शिक्षण विभागामार्फत चालविण्यात येणा-या मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित, अध्यापक विद्यालय (डी.एड) व उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत चालविण्यात येणा-या अध्यापक महाविद्यालयांमध्ये (बी.एड) शिक्षण घेणा-या अनुसूचित जमातींच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर शुल्काची प्रतिपूर्ती सध्या विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित डी.एड व बी.एड च्या अभ्यासक्रमांना शासकीय दराप्रमाणे करण्यात येते. तेथे ती पुढे चालू ठेवण्यात यावी.

५. आरक्षणाचा लाभ न घेता, गुणवत्तेनुसार खुल्या गटातील जागांवर प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातींच्या विद्यार्थ्यांसाठी सुध्दा सदरची योजना लागू राहील. तसेच एक किंवा दोन विषयांमध्ये अनुत्तीर्ण होऊन पुढच्या वर्गात ए.टी.के.टी.द्वारे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाही अनुज्ञेय राहील.

६. सदर योजनेचा लाभ घेणाऱ्या सर्व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येवू नये.

७. ही योजना अनिवासी भारतीयांकरिता (N.R.I.) विहीत कोट्यात व्यवस्थापनामार्फत देण्यात येणाऱ्या प्रवेशार्थीस व अभिमत विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही. त्याचप्रमाणे ही सलग्नत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही.

८. या बाबीवर होणारा खर्च मागणी क्रमांक टी-५, मुख्य लेखाशिर्ष २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण - राज्य योजनांतर्गत योजना - (०१)(३३) वैद्यकीय व तत्सम अभ्यासक्रमासाठी अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या(२२२५ ३५२ ९) ३४, शिष्यवृत्त्या

व विद्यावेतने या लेखाशिर्षाखाली सन २०११-१२ या आर्थिक वर्षामध्ये मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

९. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या ***www.maharashtra.gov.in*** या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र.२०११०१२१०४५४५११५१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( कैलास द. भंडलकर )
महाराष्ट्र शासनाचे उप सचिव

**प्रति,**

मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
सर्व विधानसभा/ विधानपरिषद सदस्य.
मुख्य सचिव, यांचे स्वीय सहाय्यक
प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, सामाजिक न्याय, व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, शालेय शिक्षण विभाग , मंत्रालय, मुंबई
कुलगुरु, सर्व विद्यापीठे
महासंचालक , माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
आयुक्त आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, नागपूर, अमरावती
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास, प्रकल्प.
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
अधि दान व लेखाअधिकारी, मुंबई.
निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षाची कार्यालये.
सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी आदिवासी विकास विभाग.
आदिवासी विकास विभागातील सर्व कार्यासने.
निवडनस्ती.

-----

**मान्यताप्राप्त विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

आदिवासी विकास विभाग

शासन निर्णय क्र. व्यअप्र-२००८/प्र.क्र.११५/ का.१२

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : ०९ जुलै, २००८.

<u>वाचा</u> :- १) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्र. एसएसएन-२१०३/(५०/०३)/माशि-२. दि. २७.५.२००३.

२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.सुएसजी-२००३/(८५/०३)/विशि-४. दि. २४.९.२००३.

३) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्र. एमईडी-२००३/सीआर-५०४/ भाग-३/२००३/शिक्षण-२, दि.२५.११.२००३.

४) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. टीईएम-२००३/(२४९/०३)/तांशि-१. दि.१२.५.२००४.

५) शासन निर्णय. आदिवासी विकास विभाग, क्र.व्यअप्र-२००६/प्र.क्र.१३४/का.१२ दि. १६ मार्च, २००७.

६) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.टिएम-२००६/(४२९/०७)/तांशि-२. दि.२.११.२००७.

७) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,क्र.इबीसी-२००५/प्र.क्र.२१३/मावक-२ दि. २ नोव्हेंबर, २००७.

८) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र. व्यअप्र-२००६/प्र.क्र.१३४/ का.१२. दिनांक १८ फेब्रुवारी, २००८.

९) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.टिईएम-२००८/(१८४/०८)/तांशि-१. दि. ३० जून, २००८.

<u>प्रस्तावना</u> :- मा.सर्वोच्च न्यायालयाने टी.एम.ए.पै.फाउंडेशन विरुध्द कर्नाटक शासन प्रकरणी दिनांक ३१ ऑक्टोबर, २००२ रोजी दिलेल्या निकालपत्रामध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण शुल्क निश्चित करण्याचे अधिकार संबंधित शैक्षणिक संस्थांना प्राप्त झाले. सन २००३-०४ पासून मुक्त जागा व मूल्याधारित जागा अशी विभागणी असणारी संकल्पना अस्तित्वात राहिली नाही. त्यामुळे खाजगी विना अनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती

करण्याची योजना सन २००६-०७ व सन २००७-०८ करिता लागु करण्यात आली होती. सदर योजना शैक्षणिक वर्ष सन २००८-०९ करिता देखील लागु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** : राज्यातील खाजगी मान्यताप्राप्त विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षण संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी सन २००८-०९ या वर्षी प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क समिती प्राधिकरण किंवा परिषदेने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर शुल्कांची प्रतिपूर्ती करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

सन २००६-०७ व सन २००७-०८ या वर्षामध्ये घेतलेला निर्णय सदर वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीचा लाभ अभ्यासक्रमाच्या पूर्ण कालावधीपर्यंत लागू राहील.

२. हे आदेश खाजगी मान्यताप्राप्त विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये पुढील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी व्यवस्थापन कोटयातील प्रवेश वगळून सन २००८-०९ यावर्षी प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना ते त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करेपर्यंत लागू राहतील.

अ) आरोग्यविज्ञान पदवी अभ्यासक्रम (वैद्यकीय, दंत, होमिओपॅथी, युनानी,आयुर्वेद, भौतिकोपचार, व्यवसायोपचार व नर्सिंग)

ब) उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत असणारे

| पदविका | पदवी | पदव्युत्तर पदवी |
|---|---|---|
| अभियांत्रिकी | अभियांत्रिकी | एम.बी.ए. |
| औषधनिर्माणशास्त्र | औषधनिर्माणशास्त्र | एम.सी.ए. |
| एच.एम.सी.टी. | एच.एम.सी.टी. | -- |
| -- | वास्तुशास्त्र | -- |

क) कृषी, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभागांतर्गत पदाव्यकातर्गत पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम.

३. शालेय शिक्षण विभागामार्फत चालविण्यात येणा-या मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित, अध्यापक विद्यालय (डी.एड) व उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत चालविण्यात येणा-या अध्यापक महाविद्यालयामध्ये (बी.एड) शिक्षण घेणा-या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर शुल्काची प्रतिपूर्ती सध्या विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित डी.एड व बी.एड च्या अभ्यासक्रमांना शासकीय दराप्रमाणे करण्यात येते. तेथे ती पुढे चालू ठेवण्यात यावी.

४. सदर योजना सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षात व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी लागू राहील.

५. या योजनेचा लाभ शासनाच्या सामायिक प्रवेश परिक्षेद्वारा (सी.ई.टी.) प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी देय राहील. सदर योजनेचा लाभ संस्था स्तरावर करण्यात येत असलेल्या ( Institutional Level Quota) प्रवेशास व राज्य शासनाच्या सामायिक प्रवेश परिक्षेव्यतिरिक्त अन्य परिक्षेद्वारे प्रविष्ट विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही.

६. वैद्यकीय शाखेत प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना खाजगी वैद्यकीय महाविद्यालयाच्या वतीने तसेच असोसिएशनमार्फत घेण्यात येणाऱ्या सामायिक प्रवेश परिक्षेद्वारा प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ही सवलत लागू असेल.

७. ही योजना अभिमत विद्यापिठात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही. त्याचप्रमाणे ही सवलत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही.

८. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रस्तावित शैक्षणिक शुल्क व इतर शुल्काच्या १०० टक्के दराने प्रतिपूर्ती करण्यात यावी.

९. अनुसूचित जमातीच्या उमेदवारांनी वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येवू नये.

१०. याबाबीवर होणारा खर्च मागणी क्रमांक टी-५, मुख्य लेखाशिर्ष २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण - राज्य योजनांतर्गत योजना - (१४)(०१) वैद्यकीय तत्सम अभ्यासक्रमासाठी अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या (२२२५ ३५२९) ४०-शिष्यवृत्त्या व विद्यावेतन खाली मंजूर करण्यात येणाऱ्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

११. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashrtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र.२००८०७०९१४२३१९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( अ.मु. अस्वले )
उप सचिव

प्रति,

मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई

मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई

प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग , मंत्रालय, मुंबई

सचिव, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
संचालक , तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागा, मंत्रालय, मुंबई
कृषि व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
शालेय शिक्षण विभाग , मंत्रालय, मुंबई
महासंचालक , माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
संचालक समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
आयुक्त आदिवासी विकास, नाशिक
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, नागपूर, अमरावती
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेय), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
सर्व संबंधित मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक
मुख्य सचिव, यांचे स्वीय सहाय्यक
प्रधान सचिव, (उ.व तं.शि.) यांचे स्वीय सहाय्यक
कुलगुरु, सर्व विद्यापीठे.
निवडनस्ती.

----------

**मान्यताप्राप्त विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातींच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

आदिवासी विकास विभाग

शासन निर्णय क्र. व्यअप्र-२००६/प्र.क्र.१३४/का.१२

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : १८ फेब्रुवारी, २००८.

**वाचा** :- १) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्र. एसएसएन-२१०३/(५०/०३)/माशि-२, दि. २३.५.२००३.

२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.सुएसजी-२००३/(८५/०३)/विशि-४, दि. २४.९.२००३.

३) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्र. एमईडी-२००३/सीआर-१०४/भाग-३/२००३/शिक्षण-२, दि.२५.११.२००३.

४) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. टीईएम-२००३/(२४९/०३)/तांशि-१, दि.१२.५.२००४.

५) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.व्यअप्र-२००६/प्र.क्र.१३४/का.१२ दि. १९ मार्च, २००७.

६) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.टिएम-२००६/(४२१/०७)/तांशि-१, दि.२.११.२००७.

७) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.इबीसी-२००५/प्र.क्र.११३/मावक-२ दि. २ नोव्हेंबर, २००७.

**प्रस्तावना** :- मा.सर्वोच्च न्यायालयाने टी.एम.ए.पै.फाऊंडेशन विरुध्द कर्नाटक शासन प्रकरणी दिनांक ३१ ऑक्टोबर, २००२ रोजी दिलेल्या निकालपत्रामध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क निश्चित करण्याचे अधिकार संबंधित शैक्षणिक संस्थांना प्राप्त झाले. सन २००३-०४ पासून मुक्त जागा व गुणवत्ताधारित जागा अशी विभागणी असणारी संकल्पना अस्तित्वात राहिली नाही. त्यामुळे खाजगी विना अनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातींच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्याची योजना सन २००६-०७

करिता लागु करण्यात आली होती. सदर योजना शैक्षणिक वर्ष सन २००७-०८ पासून [illegible] करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :** राज्यातील खाजगी मान्यताप्राप्त विना अनुदानित व कायम विना अनुदानित [illegible] संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी सन २००७-०८ या वर्षी प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क समिती प्राधिकरण किंवा परिषदेने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर शुल्कांची प्रतिपूर्ती करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. हे आदेश खाजगी मान्यताप्राप्त विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये पुढील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी व्यवस्थापन कोट्यातील प्रवेश वगळून सन २००७-०८ यावर्षी प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना ते त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करेपर्यंत लागू राहतील.

अ) आरोग्यविज्ञान पदवी अभ्यासक्रम (वैद्यकीय, दंत, होमिओपॅथी, युनानी, आयुर्वेद, भौतिकोपचार, व्यवसायोपचार व नर्सिंग)

ब) उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत असणारे

| पदविका | पदवी | पदव्युत्तर पदवी |
|---|---|---|
| अभियांत्रिकी | अभियांत्रिकी | एम.बी.ए |
| औषधनिर्माणशास्त्र | औषधनिर्माणशास्त्र | एम.सी.ए. |
| एच.एम.सी.टी. | एच.एम.सी.टी. | -- |
| -- | वास्तुशास्त्र | -- |

क) कृषी, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभागांतर्गत पदविकांतर्गत पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम.

३. शालेय शिक्षण विभागामार्फत चालविण्यात येणा-या मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विना अनुदानित, अध्यापक विद्यालय (डी.एड) व उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या अध्यापक महाविद्यालयामध्ये (बी.एड) शिक्षण घेणा-या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर शुल्काची प्रतिपूर्ती सध्या विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित डी.एड व बी.एड च्या अभ्यासक्रमांना शासकीय दराप्रमाणे करण्यात येते. तीच पुढे चालू ठेवण्यात यावी.

४. सदर योजना सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षात व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी लागू राहील.

५. या योजनेचा लाभ शासनाच्या सामायिक प्रवेश परिक्षेद्वारा (सी.ई.टी.) प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी देय राहील. सदर योजनेचा लाभ संस्था स्तरावर करण्यात येत असलेल्या

( Institutional Level Quota ) प्रवेशास व राज्य शासनाच्या सामायिक प्रवेश परीक्षेव्यतिरिक्त इतर परिक्षेद्वारे प्रविष्ट विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही.

६. ही योजना अभिमत विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही. त्याचप्रमाणे ही सवलत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही.

७. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रस्तावित शैक्षणिक शुल्क व इतर शुल्काच्या १०० टक्के प्रमाणे प्रतिपूर्ती करण्यात यावी.

८. अनुसूचित जमातीच्या उमेदवारांनी वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येवू नये.

९. यासंदर्भात होणारा खर्च मागणी क्रमांक टी-५, मुख्य लेखाशिर्ष २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण - राज्य योजनांतर्गत योजना - (१८)(०१) वैद्यकीय व तत्सम अभ्यासक्रमासाठी अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या (२२२५ ३५२१) ४०-शिष्यवृत्त्या व विद्यावेतन खाली मंजूर करण्यात येणाऱ्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

१०. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आला असून त्याचा संगणक क्र. २००८०११८१५१८५०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( र. शो. कामत )
उप सचिव

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
कृषि व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
संचालक समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**राज्यातील शासनमान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या <u>विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन**

आदिवासी विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक : ध्अप्र-२०१०/प्र.क्र.२५४/का.१२

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : २७ डिसेंबर, २०१०.

<u>वाचा</u> :- शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग क्र.ध्अप्र-२००९/प्र.क्र.९४/का.१२,दि.२८ ऑगस्ट, २००९.

<u>प्रस्तावना</u> :-राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षण संस्थामध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणा-या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती या योजनेस प्रथम सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षाकरीता मंजूरी देण्यात आली होती. त्यानंतर सन २००७-०८, २००८-०९ व सन २००९-१० या वर्षात सदर योजना राबविण्यास मंजूरी देण्यात आली. तथापि, सन २०१०-११ या वर्षासाठी सदर योजनेस मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय</u> : राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षण संस्थामध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची सन २०१०-११ या वर्षासाठी शिक्षण शुल्क समिती, प्राधिकरण किंवा परिषदेने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्कांची प्रतिपूर्ती करण्यास शासन मान्यता देत आहे.

२. सदर योजना सन २००६-०७, सन २००७-०८, सन २००८-०९ , सन २००९-१० व सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षात खालील व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमाच्या पूर्ण कालावधीपर्यंत लागू राहील. तथापि, विद्यार्थी अनुत्तीर्ण झाला तर शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्कांची प्रतिपूर्ती करण्यात येणार नाही.

अ) आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रम (वैद्यकीय, दंत, होमिओपॅथी, युनानी, आयुर्वेद, भौतिकोपचार, व्यवसायोपचार व नर्सिंग)

ब) उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत असणारे अभ्यासक्रम :

| पदविका | पदवी | पदव्युत्तर पदवी |
|---|---|---|
| अभियांत्रिकी | अभियांत्रिकी | एम.बी.ए. |
| औषधनिर्माणशास्त्र | औषधनिर्माणशास्त्र | एम.सी.ए. |
| एच.एम.सी.टी. | एच.एम.सी.टी. | -- |
| -- | वास्तुशास्त्र | -- |

क) कृषी, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभागांतर्गत पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच बी.एस.सी. (जैव तंत्रज्ञान).

ड) इ.१० वी ची शालांत परिक्षा (एस.एस.सी./सी.बी.एस.ई. व तत्सम) उत्तीर्ण झाल्यानंतरचे महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे पुर्ण वेळ अभ्यासक्रम (फुलटाईम कोर्स).

३. या योजनेचा लाभ विनाअनुदानीत तसेच कायम विनाअनुदानीत महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना खाली नमूद केलेल्या अभ्यासक्रमांसाठीही पुढील अटी व शर्तींच्या अधिन राहून देण्यात येईल :-

अ) <u>अभियांत्रिकी अभ्यासक्रम</u> :- शासनाच्या सामायिक प्रवेश परिक्षेद्वारा (सी.ई.टी.) प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना लागू राहील. सदर योजनेचा लाभ संस्था स्तरावर करण्यात येत असलेल्या (Institutional Level Quota) परिक्षेद्वारे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही.

ब) <u>आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम</u> :- शासनाच्या सामायिक प्रवेश परिक्षेद्वारा (सी.ई.टी.) प्रवेश घेतलेल्या तसेच खाजगी विनाअनुदानीत महाविद्यालयाच्या वतीने तसेच असोसिएशनमार्फत घेण्यात येणाऱ्या सामायिक प्रवेश परिक्षेद्वारा (Associate CET) आणि इ.१२ वी च्या गुणांच्या आधारे काही अभ्यासक्रमांसाठी (उदा.नर्सिंग) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागू राहील. एकूण प्रवेश क्षमतेच्या १५% जागा अनिवासी भारतीयांकरिता राखून ठेवल्या जातात. सदर व्यवस्थापन कोटयामध्ये प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यास तसेच अभिमत विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ कोणत्याही परिस्थितीत अनुज्ञेय राहणार नाही.

क) <u>कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय व मत्स्यव्यवसाय अभ्यासक्रम</u> :- काही अभ्यासक्रमासाठी शासनाची सामायिक परिक्षा (सी.ई.टी.) घेण्यात येत नाही. त्यावेळी इ. १२ वी च्या गुणांच्या आधारावर अशा अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ही योजना लागू राहील.

४. शालेय शिक्षण विभागामार्फत चालविण्यात येणा-या मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित, अध्यापक विद्यालय (डी.एड) व उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत चालविण्यात येणा-या अध्यापक महाविद्यालयांमध्ये (बी.एड) शिक्षण घेणा-या अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर शुल्काची प्रतिपूर्ती सध्या विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित डी.एड व बी.एड च्या अभ्यासक्रमांना शासकीय दराप्रमाणे करण्यात येते. तेथे ती पुढे चालू ठेवण्यात यावी.

५. आरक्षणाचा लाभ न घेता, गुणवत्तेनुसार खुल्या गटातील जागांवर प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी सुध्दा सदरची योजना लागू राहील. तसेच एक किंवा दोन विषयांमध्ये अनुत्तीर्ण होऊन पुढच्या वर्गात ए.टी.के.टी.द्वारे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाही अनुज्ञेय राहील.

६. सदर योजनेचा लाभ घेणाऱ्या सर्व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येवू नये.

७. ही योजना अनिवासी भारतीयांकरिता (N.R.I.) विहीत कोटयात व्यवस्थापनामार्फत देण्यात येणाऱ्या प्रवेशार्थीस व अभिमत विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही. त्याचप्रमाणे ही सवलत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही.

८. या बाबीवर होणारा खर्च मागणी क्रमांक टी-५, मुख्य लेखाशिर्ष २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण - राज्य योजनांतर्गत योजना - (०१)(३३) वैद्यकीय व तत्सम अभ्यासक्रमासाठी अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या(२२२५ ३५२ ९) ३४, शिष्यवृत्त्या व विद्यावेतने या लेखाशिर्षाखाली सन २०१०-११ या आर्थिक वर्षामध्ये मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

९. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashrtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र.२०१०१२२४११५०१५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( कैलास व. भंडलकर )
शासनाचे उप सचिव

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मुख्य सचिव, यांचे स्वीय सहाय्यक
प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, सामाजिक न्याय, व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, शालेय शिक्षण विभाग , मंत्रालय, मुंबई
कुलगुरु, सर्व विद्यापीठे
महासंचालक , माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
आयुक्त आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, नागपूर, अमरावती
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास, प्रकल्प.
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई.
निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
निवडनस्ती.

---

F:\backup\r\Desktop\desk\DESK-XII\2010 C.R. 334 -10 Jun-Jwp
प्र-२८१७ - २.

**राज्यातील शासनमान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या <u>विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन**

आदिवासी विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक : व्यअप्र-२००९/प्र.क्र.९४/का.१२

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : २८ ऑगस्ट, २००९.

<u>वाचा</u> :- शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग क्र.व्यअप्र-२००८/प्र.क्र.११५/का.१२,दि.९ जुलै, २००८.

**<u>शासन निर्णय</u>** : राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षण संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणा-या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्कची प्रतिपूर्ती करण्याची योजना सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात आली असून त्या योजनेनुसार सन २००९-१० या वर्षी प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क समिती, प्राधिकरण किंवा परिषदेने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्कांची प्रतिपूर्ती करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर योजना सन २००६-०७, सन २००७-०८, सन २००८-०९ व सन २००९-१० या शैक्षणिक वर्षात खालील व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमाच्या पुर्ण कालावधीपर्यंत लागू राहील. तथापि विद्यार्थी अनुत्तीर्ण झाला तर शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्कांची प्रतिपूर्ती करण्यात येणार नाही.:-

अ) आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रम (वैद्यकीय, दंत, होमिओपॅथी, युनानी, आयुर्वेद, भौतिकोपचार, व्यवसायोपचार व नर्सिंग)

ब) उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत असणारे अभ्यासक्रम

| पदविका | पदवी | पदव्युत्तर पदवी |
|---|---|---|
| अभियांत्रिकी | अभियांत्रिकी | एम.बी.ए. |
| औषधनिर्माणशास्त्र | औषधनिर्माणशास्त्र | एम.सी.ए. |
| एच.एम.सी.टी. | एच.एम.सी.टी. | -- |
| -- | वास्तुशास्त्र | -- |

क) कृषी, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभागांतर्गत पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच बी.एस.सी. (जैव तंत्रज्ञान).

ड) इ.१० वी ची शालांत परिक्षा (एस.एस.सी./सी.बी.एस.ई. व तत्सम) उत्तीर्ण झाल्यानंतरचे महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे पूर्ण वेळ अभ्यासक्रम (फुलटाईम कोर्स).

३. या योजनेचा लाभ विनाअनुदानीत तसेच कायम विनाअनुदानीत महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना खाली नमूद केलेल्या अभ्यासक्रमांसाठीही पुढील अटी व शर्तींच्या अधिन राहून देण्यात येईल :-

अ) <u>अभियांत्रिकी अभ्यासक्रम</u> :- शासनाच्या सामायिक प्रवेश परिक्षेद्वारा (सी.ई.टी.) प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना लागू राहील. सदर योजनेचा लाभ संस्था स्तरावर करण्यात येत असलेल्या (Institutional Level Quota) परिक्षेद्वारे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही.

ब) <u>आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम</u> :- शासनाच्या सामायिक प्रवेश परिक्षेद्वारा (सी.ई.टी.) प्रवेश घेतलेल्या तसेच खाजगी विनाअनुदानीत महाविद्यालयाच्या वतीने तसेच असोसिएशनमार्फत घेण्यात येणाऱ्या सामायिक प्रवेश परिक्षेद्वारा (Associate CET) आणि इ.१२ वी च्या गुणाच्या आधारे काही अभ्यासक्रमासाठी (उदा.नर्सिंग) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागू राहील. एकुण प्रवेश क्षमतेच्या १५% जागा अनिवासी भारतीयांकरिता राखून ठेवल्या जातात. सदर व्यवस्थापन कोटयामध्ये प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांस तसेच अभिमत विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ कोणत्याही परिस्थितीत अनुज्ञेय राहणार नाही.

क) <u>कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय व मत्स्यव्यवसाय अभ्यासक्रम</u> :- काही अभ्यासक्रमासाठी शासनाची सामायिक परिक्षा (सी.ई.टी.) घेण्यात येत नाही. त्यावेळी इ. १२ वी च्या गुणाच्या आधारावर अशा अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ही योजना लागू राहील.

४. शालेय शिक्षण विभागामार्फत चालविण्यात येणा-या मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित, अध्यापक विद्यालय (डी.एड) व उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत चालविण्यात येणा-या अध्यापक महाविद्यालयांमध्ये (बी.एड) शिक्षण घेणा-या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर शुल्काची प्रतिपूर्ती सध्या विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित डी.एड व बी.एड च्या अभ्यासक्रमाना शासकीय दराप्रमाणे करण्यात येते. तेथे ती पुढे चालू ठेवण्यात यावी.

५. आरक्षणाचा लाभ न घेता, गुणवत्तेनुसार खुल्या गटातील जागांवर प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी सुध्दा सदरची योजना लागू राहील. तसेच एक किंवा दोन विषयांमध्ये अनुत्तीर्ण होऊन पुढच्या वर्गात ए.टी.के.टी.द्वारे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाही अनुज्ञेय राहील.

६. सदर योजनेचा लाभ घेणाऱ्या सर्व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येवू नये.

७. ही योजना अनिवासी भारतीयांकरिता (N.R.I.) विहीत कोटयात व्यवस्थापनामार्फत देण्यात येणाऱ्या प्रवेशार्थीस व अभिमत विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही. त्याचप्रमाणे ही सवलत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही.

८. या बाबीवर होणारा खर्च मागणी क्रमांक टी-५, मुख्य लेखाशिर्ष २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण - राज्य योजनांतर्गत योजना - (१४)(०१) वैद्यकीय तत्सम अभ्यासक्रमासाठी अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या (२२२५ ३५२९) ४०-शिष्यवृत्त्या व विद्यावेतन या लेखाशिर्षाखाली सन २००९-१० या आर्थिक वर्षामध्ये मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

९. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashrtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र.२००९०८२८१४००१४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ग.गो. पंचभाई )
शासनाचे सह सचिव

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मुख्य सचिव, यांचे स्वीय सहाय्यक
प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, सामाजिक न्याय, व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, शालेय शिक्षण विभाग , मंत्रालय, मुंबई
कुलगुरु, सर्व विद्यापीठे
महासंचालक , माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
आयुक्त आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, नागपूर, अमरावती
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास, प्रकल्प.
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई.
निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
निवडनस्ती